**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**अमरावती विभागीय मंडळ, अमरावती—४४४६०२**
**Email: divsecamt@rediffmail. Tel. 0721-2662647,**
**Website: sscboardamravati.in**

पत्र.क्र./अविम/उमाप/३६०
अमरावती.
दिनांक — २२/०५/२०२६

प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
अमरावती विभागीय मंडळ, अमरावती.

विषय — उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु/मार्च २०२६ च्या परीक्षेचे गुणपत्रक/प्रमाणपत्र वितरण तसेच उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी) पुरवणी परीक्षा, जून—जुलै २०२६ मध्ये प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थीयादी (प्रीलीस्ट) तसेच ऑनलाईन आवेदनपत्र शुल्काच्या चलान स्विकारणे बाबत....
संदर्भ — राज्य मंडळाचे पत्र क्र/परीक्षा— २/२१८१, दि. २२/०५/२०२६ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु/मार्च २०२६ च्या परीक्षेचे गुणपत्रक/प्रमाणपत्र वितरण सोमवार दि. २५/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता करावयाचे असून कनिष्ठ महाविद्यालयांनी त्याच **दिवशी दुपारी ३.०० वाजता विद्यार्थ्यांना गुणपत्रक/प्रमाणपत्राचे व स्थलांतर प्रमाणपत्राचे वाटप करावयाचे आहे.** तसेच उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी) पुरवणी परीक्षा, जून—जुलै २०२६ मध्ये प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थीयादी (प्रीलीस्ट) तसेच ऑनलाईन आवेदनपत्र शुल्काच्या चलान इत्यादी साहीत्य खालील मान्य वितरण केंद्रावर दिनांक २५/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत खालील नमुद केंद्रावर करण्यात येत आहे. साहीत्य प्राप्त झाल्याच्या ०८ दिवसात गुणपत्रक/प्रमाणपत्रमधील दुरुस्ती विभागीय मंडळ कार्यालयात विहीत पत्रासह सादर करण्यात यावी.

| अ.क्र. | जिल्हा | केंद्राचे नाव | समाविष्ट तालुके |
|---|---|---|---|
| १ | अकोला | न्यु इंग्लीश कनिष्ठ महाविद्यालय, अकोला. | अकोला, आकोट, तेल्हारा |
| | | ज्युबीली इंग्लीश स्कुल, अकोला. | पातुर, बार्शिटाकळी, बाळापूर, मुर्तीजापूर |
| २ | अमरावती | अमरावती विभागीय मंडळ, अमरावती. | अमरावती, भातकुली, तिवसा, दर्यापूर, नांदगाव खंडेश्वर, चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे |
| | | एस जी बॉईज हायस्कुल, परतवाडा, जि. अमरावती. | अचलपूर, अंजनगाव सुर्जी, चिखलदरा, धारणी |
| | | श्री शिवाजी हायस्कुल, मोर्शी, जि. अमरावती | मोर्शी, वरुड, चांदूर बाजार |
| ३ | बुलढाणा | श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय, बुलढाणा. | बुलढाणा, मोताळा, मलकापूर, चिखली |
| | | जे व्ही मेहता हायस्कुल, खामगाव, ता. खामगाव, जि. बुलढाणा. | खामगाव, शेगाव, संग्रामपूर, नांदूरा, जळगाव जामोद |
| | | जिजामाता हायस्कुल, सिंदखेड राजा, ता. सिंदखेड राजा, जि. बुलढाणा. | मेहकर, सिंदखेड राजा, देऊळगाव राजा, लोणार |
| ४ | यवतमाळ | महात्मा फुले नगर परिषद विद्यालय, आझाद मैदाना जवळ, यवतमाळ | यवतमाळ, कळंब, बाभुळगाव, नेर, घाटंजी, आर्णी, दारव्हा, राळेगाव |
| | | श्री शिवाजी हायस्कुल पुसद, जि. यवतमाळ. | पुसद, दिग्रस, महागाव, उमरखेड |
| | | एस पी एम हायस्कुल, ता. वणी, जि. यवतमाळ. | वणी, पांढरकवडा, मारेगाव, झरीजामणी |
| ५ | वाशिम | श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय, वाशिम. | वाशिम, मालेगाव, रिसोड |
| | | जे सी कनिष्ठ महाविद्यालय, कारंजा (लाड), जि. वाशिम. | कारंजा, मंगरुळपीर, मानोरा |

**खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.**

१. प्रिलीस्ट दुरूस्तीची पाने दुरूस्ती असल्यास लाल शाईने दुरूस्ती करून स्वतंत्र पाकीटात सादर करणे अनिवार्य आहे.

२. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी श्रेणीसुधार योजनेअंतर्गत **(CIS)** प्रविष्ठ झाला असल्यास संबंधित विद्यार्थ्याच्या पुर्विच्या इ.१२ वी च्या गुणपत्रिकेची छायाप्रत सादर करावी व गुणपत्रिकेवर **(CIS)** असा उल्लेख करून आवेदनपत्र क्रमांक नमुद करावा.

३. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी जून/जुलै २०२६ परीक्षेस तुरळक विषय योजनेअंतर्गत **(ISOLATED)**/पुनपरिक्षार्थी **(REPEATER)** प्रविष्ठ झाला असल्यास संबंधित विद्यार्थ्याच्या पुर्वीच्या इ.१२ वी गुणपत्रिकेच्या छायांकीत प्रतिवर **ISOLATED/REPEATER** असा स्पष्ट उल्लेख करून आवेदन पत्र क्रमांक नमूद करुन प्रिलीस्ट सोबत सादर करावी.

४. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील दिव्यांग विद्यार्थी परिक्षेस प्रविष्ठ होत असल्यास अशा विद्यार्थ्यांचे दिव्यांग प्रमाणपत्र **(HANDICAP/DISABILITY CERTIFI CATE)** सादर करावे. प्रमाणपत्र सादर न केल्यास विद्यार्थी सवलतीपासून वंचित राहील व याची संपूर्ण जबाबदारी आपली राहील.

उपरोक्त सुचनांची सर्व प्राचार्यांनी नोंद घ्यावी व साहित्य सादर करण्याकरीता तसेच फेब्रु/मार्च २०२६ चे मुळ गुणपत्रक/प्रमाणपत्र स्विकारण्याकरीता प्रतिनीधी अधिकार पत्रासवह पाठविण्याची व्यवस्था करावी.

S. Salunke 23.05.2026
(संगीता साळुंके)
विभागीय सहा. सचिव,
अमरावती विभागीय मंडळ, अमरावती.

**प्रतिलिपी :—**

१. शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती.
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. अकोला, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम.